निवडक



## ग्राहक सुरक्षा समितीचे जागृती सत्र

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २८ :** गोवा चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रिडच्या ग्राहक सुरक्षा समितीतर्फे अलिकडेच या वर्षाचा त्यांचा नववा कार्यक्रम आयोजित केला. जी.सी.सी. आयच्या हॉलमध्ये आयोजित झालेल्या या कार्यक्रमाचा विषय होता. 'ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्ड वरील जागृतीसत्र' खांडोळा सरकारी कॉलेजच्या एम.ऑम.पार्टरचे विद्यार्थी त्यांच्या चार प्राध्यापकांसमवेत या कार्यक्रमाला खास उपस्थित होते. हुबळी येथील बी.आय.एस चे शाखेचे वृद्धी अधिकारी अहमद महमद यांनी आपल्या जागृतीपर भाषणात ब्युरो ऑफ इंडियन स्टॅण्डर्डसची व्याप्ती, त्यांची व्यापक कार्यप्रणाली प्रॉडक्ट अर्टिफिकेटस प्रमाणिकरण, दर्जा चाचणी या विषयीची सविस्तर माहिती दिली. उत्पादन सुरक्षा आणि ग्राहकांच्या दृष्टीने त्याचे महत्त्व यावरही त्यांनी उहापोह केला. दागिने खरेदी करताना हॉल मार्क चिन्ह तपासावे हेल्मेट गॅसबत्ती रेग्युलेटर ट्यूब पादत्राणे खरेदी करताना त्यावर आय.एस.आय चिन्ह आहे की, नाही रे, हे तपासणे गरजेचे आहे, असे सांगून विविद चिन्हांविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.

प्रारंभी वरील समितीच्या अध्यक्ष अमिता नायक सलत्री यांनी स्वागतपर भाषण केले. तसेच समितीतर्फे आतापर्यंत आयोजित केलेल्या आठही कार्यक्रमांचा आढावा घेतला. या समितीच्या समन्वयक मालिनी रॉड्रिग्ज यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली. वरील समितीचे उपाध्यक्ष के. एस. नायर यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन या समितीचे सदस्य अ‍ॅड. सुभाष कवठणकर यांनी केले. गोवा चेंबर ऑफ कॉमर्स आणि इंड÷स्ट्रीजचे डायरेक्टर जनरल संजय आमोमकर या कार्यक्रमाला खास उपस्थित होते. एका महत्त्वापूर्ण विषयासंबंधित वरील कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी अमित नायक सलत्री आणि इतर सदस्यांचे अभिनंदन केले.

## नानोडा येथील प्रसिद्ध अवसारी घोडेमोडणी आज

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २८ :** नानोडा – डिचोली येथील प्रसिध्द अवसारी घोडेमोडणी शनिवार दि. २९ मार्च रोजी गुढी पाडव्याच्या पूर्वसंध्येला होणार आहे. ठराविक मान्यता झालेले दोन घोडे यांची सुरूवात ग्रामदेवी श्री सातेरी केळबाई पुरमार मंदिराकडून देवीला गाऱ्हाणे घालून सूरूवात होते मग ते पारंपरिक वाटेने जावून चव्हाटेश्वर मंदिराला मान देवून थेट श्री शांतादुर्गा मंदिरात तिकडे मानकऱ्यांकडून विधीवत पूजा – अर्चा करून श्री व्यंकटेश देवस्थानकडील पिंपळाकडील स्थानाला मान देवून तेथून त्याच वाटेने श्री भूतनाथ रवळनाथ मंदिराला मान दिल्यावर त्यांची मानकत्याकडून पूजा – अर्चा करून पारंपरिक वाटेने मुळगांवची सीमेकडील साखळेश्वर घुमटीला मान दिला जातो त्या स्थानाकडे घोड्यांना अवसर येतो. यावेळी मार्गात प्रस्थान करताना घोड्यांबरोबर मोठ्या संख्येने लोकही असतात. त्या स्थानाला मान दिल्यावर मुख्य रस्त्यावरून येवून ते कासरपाल येथील सीमेवरील उभा गुंडा या स्थानाला भेट देवून त्यांना तेथून परतविले जाते वाटेतून येताना लोकांकडून घोड्यांची पुजा केली जाते मग ते पारंपरिक वाटेने पाण्यातून मार्ग एका जून्या स्थानकाकडे त्यांना विश्रांती साठी ठेवले जातात पूर्वीपासून चालत आलेला विधी किंवा मानापमान झाल्यावर काही अंतरावरील असलेल्या जुन्या स्थानाकडे घोड्यांना अवसर येतो ते पाहण्यासाठी लोकांची गर्दी असते तेथून त्यांना परतविल्यावर प्रत्येक स्थानाला मान देवून त्यांची श्री सातेरी मंदिरात त्यांना मंदिराचे पुरोहितकडून देवीची तीर्थ प्यायला दिल्यावर त्यांचा थोडा थोडा करून अवसर कमी कमी होत जातो व घोडेमोडणीची सांगता होते. त्यानंतर ग्राम देवी श्री सातेरी देवी आणि श्री शांतादुर्गा कलंगुटकरीण देवता एकमेकांना मन मानापमान स्वीकारल्यानंतर रात्री कलंगुट ग्रामस्थांतर्फे नाटक सादर केले जाते. दुसऱ्या दिवशी नूतन वर्ष (गुढी पाडवा) च्या शुभमुहूर्तावर देवीचे न्हावण दिले जाते. कळसाची मंदिरात पुरोहितकडून विधिवत पूजा केली जाते. त्यानंतर गावचे गावकरी कडून कळस गावात फिरविला जातो. काही ठिकाणी कळसाची घरात घरच्या मंडळीकडून पूजा केली जाते.

जाणकारांच्या मते घोडेमोडणी म्हणजे हिंदू धर्म नूतन वर्षाच्या पूर्वसंध्येला गावच्या सीमेची बांधणी करणे होय. लाटांबारसे पंचकोशीतील ही अवसारी घोडेमोडणी म्हणून प्रसिध्द असल्याने ही पाहण्यासाठी लोकांची फारच गर्दी असते.

## गावकरवाडा सुर्ला ट्रान्सफॉर्मरवर आज खंड़ित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २८ :** शनिवार दि. २९ रोजी गावकरवाडा सुर्ला वीज ट्रान्सफॉर्मरवर सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजता यावेळेत वीज वाहिन्याना लागणाऱ्या झाडांच्या फांद्या तोडायच्या असल्याने तसेच वीज वाहिन्यांच्या देखभालीचे काम करायचे असल्याने गावकरवाडा सूर्ला परिसरात वीजपुरवठा असणार नाही.यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## केरी-सत्तरीत उद्या गुढीपाडव्यानिमित्त गुढी संस्कृतीची कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २८ :** सार्वजनिक गुढीपाडवा उत्सव समिती केरी–सत्तरीतर्फे गुढी पाडव्यानिमित्त रविवार दि. ३० रोजी 'गुढी संस्कृतीची' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा गुढीपाडवा उत्सव विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे.

यानिमित्त सकाळी ६.३० वाजता केरी सरकारी माध्यमिक विद्यालयाकडून केरी ग्रामपंचायत क्षेत्रात दुचाकीवरून मंगलफेरी होईल.सकाळी ८.३० वाजता ग्रामस्थांच्या उपस्थितीत पुरोहित अभय किंजवडेकर यांच्या पौरोहित्याखाली सौ. अंकिता व श्री. रणजित पाटील यांच्या यजमानपदाखाली शास्त्रोक्त पद्धतीने 'सार्वजनिक गुढीरोहण सोहळा' होईल.सुवासिनींनी यावेळी गुढीला ओवाळण्यासाठी पंचारती घेऊन उपस्थित रहावे.

संध्याकाळी ५.३० वाजता लोकमान्य मल्टिपर्पज बँक केरी ते सरकारी हायस्कुल केरीपर्यंत श्री तोणयेश्वर शिमगोत्सव मंडळातर्फे रोमटामेळ सादरीकरण होईल. ६.३० वाजता सरकारी माध्यमिक विद्यालय केरी–सत्तरीच्या मैदानावर व्यासपीठ कार्यक्रम होणार असून या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून केरी ग्रामपंचायतीच्या सरपंच सुप्रिया गावस ,प्रमुख वक्ते म्हणून शिक्षक, कीर्तनकार, नाट्यकलाकार ह.भ.प. गुरुदासबुवा सुतार, खास निमंत्रित केरी ग्रामपंचायतीचे उपसरपंच उस्मान सय्यद उपस्थित राहणार आहेत.

संध्याकाळी ७.३० वाजता श्री भूमिका देवी संगीत विद्यालय पर्ये–सत्तरीतर्फे विद्याधर गोखले लिखित व शिवनाथ नाईक दिग्दर्शित 'सं. सुवर्ण–तुला' नाटक होईल.

कार्यक्रमाला सर्व ग्रामस्थ व हितचिंतकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी अध्यक्ष सूर्यकांत माजिक (७५०७३१४१००), सचिव राघोबा लवू पेडणेकर (९६५७०१२७२८) किंवा खजिनदार रोवेश शेलार (९१६८२२५५५७) यांच्याकडे संपर्क साधावा.

# जोकोविचने फेडररचा विक्रम मोडला

### १००व्या विजयापासून एक पाऊल दूर | मियामी ओपनचा उपांत्य फेरीतील सर्वात वयस्कर खेळाडू ठरला

नवी दिल्ली, दि. २८ :

सर्बियन टेनिसपटू नोवाक जोकोविच एटीपी मास्टर्स १००० स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचणारा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला आहे. त्याने रॉजर फेडररचा ६ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला. २०१९ मध्ये इंडियन वेल्स आणि मियामी ओपनच्या उपांत्य फेरीत पोहोचून रॉजर फेडररने हा विक्रम केला होता. तेव्हा तो ३७ वर्षे आणि ७ महिन्यांचा होता. शुक्रवारी, जोकोविचने ३७ वर्षे आणि १० महिने वयाच्या मियामी ओपनच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला. जर शनिवारी होणारा उपांत्य सामना जोकोविचने जिंकला तर तो त्याचा १०० वा व्यावसायिक विजय असेल.

चौथ्या मानांकित जोकोविचने उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या १४ व्या मानांकित सेबास्टियन कोर्डाचा ६–३, ७–६ असा पराभव केला. शनिवारी होणाऱ्या उपांत्य फेरीत जोकोविचचा सामना बल्गेरियाच्या ग्रिगोर दिमित्रोव्हशी होईल.

आतापर्यंत दोघांमध्ये १३ सामने झाले आहेत, त्यापैकी जोकोविचने १२ सामने जिंकले आहेत. दिमित्रोव्हने १ सामना जिंकला आहे. गेल्या वर्षी, ग्रिगोर दिमित्रोव्ह मियामी ओपनच्या अंतिम फेरीत पोहोचला होता, ज्यामध्ये तो जॅनिक सिनरकडून पराभूत झाला होता.

नोवाक जोकोविचने आतापर्यंत २४ ग्रँड स्लॅम जेतेपदे जिंकली आहेत. त्याने १० ऑस्ट्रेलियन ओपन, ३ फ्रेंच ओपन, ७ विम्बल्डन आणि ४ यूएस ओपन जेतेपदे जिंकली आहेत. तो अनेक वेळा जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानावर राहिला आहे आणि जास्तीत जास्त आठवडे अव्वल स्थानावर राहण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे.

शुक्रवारी महिलांच्या उपांत्य फेरीत आर्यना सबालेंकाने इटलीच्या जास्मिन पाओलिनीचा ६–२, ६–२ असा पराभव केला. आता शनिवारी होणाऱ्या अंतिम सामन्यात सबालेंकाचा सामना अमेरिकेच्या जेसिका पेगुलाशी होईल. पेगुलाने फिलीपिन्सच्या १९ वर्षीय अलेक्झांड्रा इलाचा तीन सेटमध्ये पराभव केला.



## लखनौचा हैदराबादवर दणदणीत विजय

**हैदरबाद, दि. २८ :**

लखनौ सुपर जायंट्स संघाने वादळी फलंदाजीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हैदराबादविरूद्ध विस्फोटक फलंदाजी करत ५ विकेट्सने विजय मिळवला. लखनौच्या संपूर्ण संघाने उत्कृष्ट कामगिरी करत हैदराबादला सामन्यात कायमच बॅकफूटवर ठेवलं. गोलंदाजांनी हैदराबादच्या फलंदाजांवर आळा घातला. तर निकोलस पूरन आणि मिचेल मार्शने हैदराबादच्या गोलंदाजांची धुलाई करत गतवर्षीच्या पराभवाचा व्याजासकट बदला घेतला. या विजयासह लखनौने आयपीएल २०२५ च्या गुणतालिकेत आपले खाते



उघडले आहे.

गतवर्षी म्हणजेच आयपीएल २०२४ मध्ये हैदराबादचे सलामीवीर अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडने १० विकेट्सने लखनौचा ६२ चेंडू राखून मोठा मानहानीकारक पराभव केला होता. निकोलस पूरन आणि मिचेल मार्श यांनी देखील आपल्या विस्फोटक फलंदाजीने त्या पराभवाचा बदला घेत संघाचा विजय निश्चित केला. निकोलस पूरन आणि मिचेल मार्श यांनी ११६ धावांची संघासाठी मोठी भागीदारी रचली.

निकोलस पूरनने पुन्हा एकदा विस्फोटक खेळीचा नमुना सादर केला. पूरनने २६ चेंडूत ६ चौकार आणि ६ षटकारांसह ७० धावांची खेळी केली. तर मिचेल मार्शनेही त्याला चांगली साथ दिली. या दोघांच्या खेळीमुळे लखनौने त्यांची पॉवरप्लेमधील सर्वात मोठी धावसंख्या उभारली. लखनौने पॉवरप्लेमध्ये १ बाद ७७ धावा केल्या. तर ८ षटकांतच लखनौने १०० धावांचा टप्पा गाठला होता.

## चोडणमध्ये चक्रीवादळात एक कोटींची हानी

**आमदार प्रेमेंद्र शेट यांनी केली पाहणी : मदत कार्य सुरूच**

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २८ :** मये मतदारसंघातील चोडण पंचायत क्षेत्रात बुधवारी चक्रीवादळाचा तडाखा बसून अनेक वृक्ष वीज खांब वीजवाहिन्या कोसळून काही घरांची नुकसानी झाली असून सुमारे एक कोटी अधिक मालमत्तेची हानी झाली आहे.

अग्नी ग्रिशक दलाचे जवान मदत कार्यत गुंतलेले असून अनेक ठिकाणी पडझड झाल्याने तसेच सुमारे ४० अधिक वीज खांब कोसळल्याने वीज व्यवस्थेवरील परिणाम झाला आहे.

आमदार प्रेमेंद्र शेट यांनी वादळग्रस्त भागाची पाहणी केली.



तसेच तलाठ्यांना तातडीने नुकसानीचा आढावा घेण्याचे व पंचनामा करण्याच्या सूचना केल्या असून मुख्यमंत्री सहाय्या निधी वापरता निधीतून आर्थिक मदत पुरवण्यासाठी सर्वत्र प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे.

पंचायतीचे सरपंच सिलवाना परेरा पांडुरंग वायंगणकर यांच्यासह पंच ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत आमदार शेट यांनी विविध भागाची पाहणी केली. चक्रीवादळात मोठे नुकसान झाले असून वीज वाहिन्या व वीज खाब कोसळल्याने परिणाम झाल्याचे सांगितले.

वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी वीज खात्याच्या अधिकाऱ्यांची चर्चा करून तातडीने पूर्वत करण्याच्या सूचना करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## साखळीत दोन दिवशीय कृषी मेळाव्याचे उद्‍घाटन

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. २८ :** गोवा राज्याला हरित व धवल क्रांती बरोबरच गोवा स्वयंपूर्ण करण्यासाठी शेतकरी हा महत्त्वाचा घटक आहे. राज्यात लवकरच एग्रो क्लीनिक सुरू करण्यात येणार असून राज्यातील पडीक जमिनी लागवडीखाली आणण्यासाठी युवकांनी समूह शेतीचा मार्ग अवलंबताना सेंद्रिय पद्धतीने शेती करून स्वयंपूर्ण गोवाचा ध्यास प्रत्यक्षात आणण्यासाठी विशेष कार्यरत राहावे.

कृषी पर्यटनाला चालना देत असताना फार्म हाऊसला अनुदान देण्याचा सरकारचा विचार असून केंद्र सरकारने कोट्यावधींच्या योजना युवाशक्तीला शेतीकडे वळवण्यासाठी राबवण्यात आहे, त्याचा योग्य वापर करून हरित व धवल क्रांती करताना गोवा आदर्श कृषी राज्य कर बनवण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी साखळी येथे केले.

राज्यात लवकरच ॲग्रो क्लिनिक करण्यात येणार आहे. शेतकऱ्याला पाच लाख रुपयापर्यंत चार टक्के व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे तसेच केंद्र व राज्याच्या अनेक योजनांच्या माध्यमातून समूह शेती तसेच वेगवेगळ्या उत्पादनासाठी पूर्ण सहकार्य देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

देवस्थान समित्या तसेच कोमुनिदाद यांनी शेती विकासासाठी आपल्या जमिनी उपलब्ध करून दिल्यास त्याचा समूह शेतीसाठी उत्तम पद्धतीने वापर करण्यासाठी सरकार सर्व ते प्रयत्न



करण्यास कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

१००% शेतकऱ्यांना कृषी कार्ड उपलब्ध करून देणे सेंद्रिय उत्पादन व इतर बाबतीत प्रोत्साहन देत असताना त्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ही सरकार विविध योजना आखात असून लखपदी होण्यासाठी शेतकऱ्यांनी योगदान द्यावे, असे मुख्यमंत्री म्हणाले उत्पादन व बाजारपेठ यांच्यात समन्वय साधून वैज्ञानिक दृष्टी ठेवून मार्केटिंग केल्यास कृषी क्षेत्राला मोठी चा लना देणे शक्य आहे. आज कृषी क्षेत्रात कोटींची उलाढाल होत आहे. गोवा स्वयंपूर्ण होणे गरजेचे आहे फलोत्पादन मंडळ देशपातळीवर आदर्श संस्था म्हणून कार्यरत असून मोठ्या प्रमाणात स्थानिक भाजी विक्री करून शेतकऱ्यांना लाखो रुपयांचा नफा मिळवण्यात योगदान दिले आहे, असे मुख्यमंत्री डॉक्टर सावंत यांनी सांगितले

राज्यातील महिला स्वयंसेवा गट व वर्षाला ३०० कोटीची उलाढाल करीत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. यापुढे सहकारी मल्टिपर्पस संस्थांना कृषी क्षेत्रातही चालना देण्यासाठी विशेष योजना राबवण्यात आलेली असून त्या अंतर्गत सर्व मल्टीपल सोसायटींना कृषी क्षेत्र ही योगदान देण्याची संधी देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आपल्या जमीन पैशाच्या लोभा साथी रसायन किंवा स्क्रॅप यार्ड डंपिंग साथी देवू नका तर स्वतः कष्ट करून हरित क्रांती साकारा असे कळकळीचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना केले.

यावेळी प्रेमेंद्र शेट, संचालक संदीप फळदेसाई, किशोर भावे, गोपाळ सुरलीकर, महेश सावंत, सिद्धी प्रभू परब, शंकर चोडणकर, विजयकुमार नाटेकर, नीलिमा गावस, चंद्रहास आदी उपस्थित होते.

कृषी संचालक संदीप फळ देसाई यांनी स्वागत पर भाषणातबायर सेलर मेळाव्याचा उद्देश स्पस्ट केला. कृषी विकास योजनेतर्गत सेन्ट्रीय शेती करण्यासाठी विविध योजनाची माहिती दिली. यावेळी शेतकी स्टॉल्स लां मुख्यमंत्र्यांनी भेट देवून पाहणी केली तसेच सर्वांशी संवाद साधला. दोन दिवसीय मेळाव्यात विविध तज्ज्ञ मार्गदर्शन करणार असून विविध योजनांची माहितीही देण्यात येणार आहे.

## रावण सत्तरी येथे आजपासून 'ग्रामीण साहित्य संमेलन'

### दोन दिवशीय संमेलनात विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. २८ :** साहित्य मंथन – सत्तरी व श्री सातेरी केळबाय देवस्थान समिती रावणतर्फे शनिवार दि. २९ व रविवार दि. ३० रोजी चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. येथील श्री सातेरी केळबाय देवस्थान सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवशीय संमेलनात विविध कार्यक्रम व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले आहे.यात राज्यभरातील साहित्यिक,कलाकार सहभागी होणार आहेत.

शनिवार दि. २९ रोजी संध्याकाळी ३.३० वाजता होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यास उदघाटक म्हणून गोवा वन विकास महामंडळाच्या अध्यक्ष तथा पर्येच्या आमदार डॉ. देविया राणे उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यासोबत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते लेखक दामोदर मावजो,केंद्रीय साहित्य अकादमी पुरस्कार विजेते लेखक डॉ. प्रवीण बांदेकर, संमेलनाध्यक्ष म्हणून लोकवेद संशोधक कमलाकर म्हाळशी, केरी जिल्हा पंचायत सदस्य सौ.देवयानी गावस, केरीच्या सरपंच सौ.सुप्रिया गावस,रावणच्या पंच सदस्य सौ.नंदिता गावस,देवस्थानचे अध्यक्ष तथा संमेलनाचे स्वागताध्यक्ष व श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान समितीचे अध्यक्ष सत्यवान गावस,साहित्य मंथन सत्तरीचे अध्यक्ष काशिनाथ नाईक व चौथ्या ग्रामीण साहित्य संमेलनाचे कार्याध्यक्ष गणेश शेटकर उपस्थित असणार.

ग्रामीण साहित्य संमेलनात यंदा स्व.सौ.लक्ष्मी विष्णू गांवस यांच्या स्मरणार्थ पहिला ग्रामभूषण पुरस्कार देण्यात येणार असून लोकवेद अभ्यासक गोपीनाथ गांवस यांनी पुरस्कार पुरस्कृत केलेला आहे.यंदा हा पुरस्कार लोककलाकार जानकी रामा गावस यांना जाहीर करण्यात आला आहे.हा पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात येईल.तसेच ग्रामीण जीवन, लोकसंस्कृतीचे चित्रण असलेल्या विशेष स्मरणिकेचे यावेळी प्रकाशन होणार आहे.उद्घाटन सोहळ्यानंतर रात्री स्थानिक तसेच आमंत्रीत कलाकार विविध लोककलांचे सादरीकरण करणार आहेत.या सत्राचे सूत्रसंचालन गोपीनाथ गावस तर आभार प्रदर्शन राजू बर्वे करतील.या सत्राचे मुख्य संयोजक समीक्षा शिरोडकर तर सजावट संयोजक समीर प्रभू आहेत.

संध्या.५.३० वा .चहापान,पहिल्या ६ वा. 'गावची अर्थव्यवस्था :तेन्ना आनी' यावर कृषितज्ज्ञ डॉ.सचिन तेंडुलकर यांचे व्याख्यान होणार असून संयोजक राघोबा लवू पेडणेकर आहेत.दुसऱ्या सत्रात ७ वा. गावमांड हा आमंत्रित लोककलाकारांचा सांस्कृतिक कार्यक्रम होणार असून यात श्री पारवडेश्वर महिला मंडळ केरी–सत्तरी,ज्ञानज्योती महिला मंडळ केरी–सत्तरी,आणि रावण गावातील महिला कलाकार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतील.याचे संयोजक मनीषा गावस व अंजिता गावस आहेत. रात्री ८.३० वा. भोजन होणार असून याचे संयोजक काशिनाथ गावस आहेत.

रविवार दि. ३० रोजी तिसऱ्या सत्रात सकाळी ६.३० वा. 'सकाळच्या पारार' ही रावण गाव भ्रमंती होईल.याचे संयोजक पांडुरंग गावस आहेत. ७.३० वा. नाश्ता व चहापान, याचे संयोजक सत्यवान गावस आहेत.

सकाळी ९ वा.काव्य आणि गीत गायनाचा कार्यक्रम होणार असून यात आमंत्रित कवी आणि लोककलारांचे गीत गायन होईल. या सत्राच्या अध्यक्षस्थानी लोकमत गोवाचे संपादक सद्गुरू पाटील असतील. या सत्रात संध्या गावकर, मनीषा गावस, वर्षा मालवणकर, अमेय नाईक, अंबेश तळवडकर, सागर गावस, सावित्री गुरुदास मोरजकर, उत्कर्षा उत्तम गावस, चित्रा क्षीरसागर, सारिका नाईक, लाडको कुडतरकर, अस्मिता राणे पांगम, नारायण गावस, आकाश गावकर, विशाल गावस सहभागी होणार असून या सत्राचे संयोजक महादेव गावकर आहेत.

सकाळी १०.३० वा. 'माकाय मात्सा बोलांक जायां' या पाचव्या सत्रात ग्रामीण भागातील महिलांची अभिव्यक्ती होणार असून यात गोपीनाथ गावस हे सौ.बेबी बाबी मोटे (लोककलाकार भुईपाल), उत्कर्षा गावस (अष्टपैलू व्यक्तिमत्व–केरी–सत्तरी), प्रेरणा प्रल्हाद गावस (लघु उद्देजिका–केळावडे) यांची मुलाखत घेणार आहेत. या सत्राचे संयोजक सारिका नाईक आहेत.

सकाळी ११.३० वा. सहाव्या सत्रात 'आमचो गाव आमचा साहित्य–लेखकाची जबाबदारी' या मथळ्याखाली गोवा कोंकणी अकादमीचे अध्यक्ष वसंत सावंत यांच्या अध्यक्षतेखाली सत्र होणार असून यात कांता गावडे (लोककलाकार), प्रा. दीपराज सातार्डेकर (नाटक), झिलू गावकर (लोकवेद संशोधक), शशिकांत पुनाजी (ग्रामीण कवी) सहभागी होणार आहेत.सत्राचे संयोजक संजय सालेलकर आहेत.

दुपारी १ वा. जेवण,याचे संयोजक आपा गावस आहेत. २.३० वाजता ग्रामीण साहित्य संमेलनाचा समारोप सोहळा होणार असून ज्येष्ठ लेखक प्रा. मोहन कुंभार या सोहळ्याला प्रमूख पाहूणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच गोवा विद्यापीठाचे कुलसचिव प्रो. डॉ. सुंदर धुरी अध्यक्ष म्हणून उपस्थित असतील. सूत्र संचालन नमन सावंत धावस्कर करणार असून गणेश शेटकर आभार मनातील. या संमेलनात पुस्तक प्रदर्शन, ग्रामीण जीवनावर आधारीत छायाचित्रांचे प्रदर्शन, विविध प्रकारचे स्टॉल्स या संमेलनाचे आकर्षण असणार आहे.

दोन दिवशीय ग्रामीण साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन साहित्य मंथन – सत्तरीचे अध्यक्ष काशिनाथ नायक ,कार्याध्यक्ष गणेश शेटकर व देवस्थान समितीचे अध्यक्ष सत्यवान गावस यांनी केले आहे.

साहित्य मंथन– सत्तरी ही संस्था गेली चौदा वर्षे साहित्याच्या क्षेत्रात गोव्यातील अतीदुर्गम भागात कार्यरत आहे. या संस्थेअंतर्गत एक फिरता द्विमासिक साहित्यीक कार्यक्रम आयोजित केला जातो.यात साहित्याला केंद्रस्थानी ठेऊन विविध विषयांवर चर्चा आयोजित केली जाते.साहित्य प्रकाशनासाठी साहित्य चेतना हा त्रैमासिक डिजीटल अंकही प्रकाशित केला जातो.ग्रामीण साहित्य संमेलन हे साहित्य मंथन –सत्तरी या संस्थेचा एक महत्वाचा उपक्रम आहे.आतापर्यंत तीन ग्रामीण साहित्य संमेलने आयोजित केलेली असून गोव्याच्या साहित्यिक इतिहासात या ग्रामीण संमेलनाला वेगळे स्थान प्राप्त झाले आहे.साहित्य मंथन–सत्तरी संस्थेचे हे कार्य उल्लेखनीय असून समाज जिवनात होणारी अनेक स्थितंतरे आपल्या साहित्य लेखनातून अधोरेखीत करण्याचं काम साहित्यिक करत आहेत.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २०५ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 205 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .